पिण्याच्या पाण्याची टंचाई अंतर्गत टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात संयुक्त पाहणी करण्यासाठी गठीत केलेल्या समितीची निवडणुकीच्या कालावधीत पुनर्रचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. ४१ /पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : २० मार्च, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : टंचाई ३०१९/प्र.क्र. १३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग,क्रमांक : एससीवाय-२०१८/प्र.क्र.२४७/म-७, दिनांक २९.११.२०१८

प्रस्तावना -

पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर करण्यासाठी हाती घ्यावयाच्या आकस्मिक उपाययोजनांमध्ये टँकर/ बैलगाडीव्दारे पाणी पुरवठा करणे या उपाययोजनांचा समावेश होतो.ज्या गावात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा टँकर / बैलगाडीने करणे आवश्यक वाटेल, त्या गावांची संयुक्त पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी समिती गठीत करावी अशी तरतूद करण्यात संदर्भाधीन क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. सदर समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा निवडणूक -२०१९ दिनांक १० मार्च, २०१९ पासून जाहिर केली आहे. सदर कालावधीत आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत ज्या गावात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा टँकर / बैलगाडीने करणे आवश्यक वाटेल, त्या गावांची संयुक्त पाहणी करण्यासाठी समितीची पुनर्रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१. उप विभागीय अधिकारी	अध्यक्ष
२. गट विकास अधिकारी	सदस्य
३. तहसिलदार	सदस्य सचिव

२. उपरोक्त समिती लोकसभा निवडणूक- २०१९ ची आदर्श आचारसंहिता लागू असे पर्यंत अस्तित्वात राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२०१७१३४२४९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2019.03.20 17:43:32 +05'30'

(श्याम लाल गोयल)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. उप विभागीय अधिकारी (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३. तहसिलदार (सर्व)
१४. गट विकास अधिकारी (सर्व)
१५. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६. पापु १४ (निवडनस्ती)